53

गोपनिय

जा.क्र.६१९/सपोआ/सुरक्षा/०९,
सहाय्यक पोलीस आयुक्त,
सुरक्षा शाखा, मुंबई.

दिनांक –२७/०३/२००९

प्रति,

पोलीस उप आयुक्त,
परिमंडळ – ९
मुंबई

विषय :– आयपीएल आयुक्त श्री ललीत मोदी यांना शकील गॅंगकडुन असलेल्या धोक्याबाबत.

संदर्भ :– १) मा. आयुक्त, राज्य गुप्तवार्ता, म.रा. मुंबई यांचे अ.शा.प.क्र. ५/टीईआर/०९–४८, दि. २६/०३/२००९

महोदय,

वरिल विषय व संदर्भा अन्वये आपणास सुचित करण्यात येते की, मा. आयुक्त, राज्य गुप्तवार्ता यांचे अ.शा.पत्र.क्र ५/टीईआर/०९–४८, दि.२६/३/०९ हे प्राप्त झाले असून नमूद पत्रात आय.पी.एल आयुक्त श्री ललीत मोदी यांचे जीवीतास शकील गॅंगकडुन ते राहत असलेल्या जुहू, मुंबई या निवासस्थानी धोका होण्याची शक्यता आहे. त्याकरीता छोटा शकील टोळीचे काही सदस्य जुहू परिसराची माहिती घेण्याकरीता व श्री ललीत मोदी यांचे निवासस्थानी सुरक्षा रक्षक नेमलेले आहेत काय ? हे पहाण्यासाठी पाठविलेले आहेत अशी गोपनीय माहिती प्राप्त झालेली आहे.

वरील गोपनिय माहितीच्या अनुषंगाने आपल्या अधिपत्याखालील जुहू पोलीस ठाणे हद्दीत आय.पी.एल. आयुक्त श्री ललीत मोदी यांचे निवासस्थानी योग्य तो बंदोबस्त नेमून त्यांच्या जिवीतास धोका होणार नाही याबाबत दक्षता घ्यावी व कोणताही अनुचीत प्रकार घडणार नाही याबाबत आवश्यक ती कारवाई करणेस विनंती आहे.

आपला विश्वासु,

O/C

सहाय्यक पोलीस आयुक्त,
सुरक्षा शाखा, मुंबई.

प्रत माहितीकरीता सविनय सादर.
१) अपर पोलीस आयुक्त, संरक्षण व सुरक्षा, मुंबई.
२) अपर पोलीस आयुक्त, गुन्हे शाखा, मुंबई.
प्रत पुढील कारवाईकरीता
वरिष्ठ पोलीस निरीक्षक, जुहू पोलीस ठाणे, मुंबई.